आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार, दिनांक : २१ ऑगस्ट, २०२४

आकाशवाणी नागपूर,

स्वाती सोनपेठकर आपल्याला प्रादेशिक बातम्या देत आहे.

ठळक बातम्या

1. अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरण आणि क्रिमिलियर लागू करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया विरोधात आयोजित भारत बंदला विदर्भात संमिश्र प्रतिसाद.

2. बदलापूर लैंगिंक अत्याचार प्रकरणी आरोपी अक्षय शिंदेच्या पोलीस कोठडीत २६ ऑगस्टपर्यंत वाढ, विरोधी पक्षांतर्फे २४ ऑगस्ट रोजी पाळला जाणार बंद.

3. रत्नागिरी विमानतळाच्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन, सर्व तालुक्याच्या ठिकाणी हेलिपॅड निर्मितीसाठी प्रयत्न करणार असल्याचं प्रतिपादन.

4. बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ इथं आयोजित पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते उदघाटन.

#####

**भारत बंद**

अनुसूचित जाती व जमातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरण व क्रिमिलियर लागू करण्याचे अधिकार राज्य सरकारला असल्याचा निकाल १ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या ७ सदस्य खंडपीठाने दिला होता. त्या निर्णयाच्या विरोधात दलित आणि आदिवासी संघटनांच्या वतीने नागपुरात अनेक भागातुन निषेध रॅली काढण्यात आली. नागपुरात भारत बंद ला उत्सुफूर्त प्रतिसाद पहायला मिळाला.

गोंदिया जिल्ह्यात देखिल कडकडीत बंद पाळण्यात येत आहे. तर भंडारा जिल्ह्यात बंदला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून शाळा कॉलेज आणि संपूर्ण बाजारपेठ बंद होत्या. विविध सामाजिक संघटना आणि राजकीय संघटनेने या बंदमध्ये सहभाग घेतला होता. यामध्ये कॉंग्रेसचे खासदार प्रशांत पडोळे यांनी देखील सहभाग घेतला होता.

आज आरक्षण बचाव संघर्ष कृती समितीच्या वतीने गडचिरोली या जिल्हा मुख्यालयासह देसाईगंज, चामोर्शी, कुरखेडा, इत्यादी तालुक्यांमध्येही कडकडीत बंद पाळून धरणे आंदोलन करण्यात आले.

**बदलापूर प्रकरण**

बदलापूर इथल्या शाळेत दोन चिमुकलींवर लैगिंक अत्याचार करणाऱ्या अक्षय शिंदेच्या पोलीस कोठडीत न्यायालयानं २६ ऑगस्टपर्यंत वाढ केली आहे. तर आरोपी अक्षय शिंदेंचे वकीलपत्र घेण्यास वकिलांनी नकार दिला आहे. कडेकोट पोलीस बंदोबस्तात आरोपीला न्यायालयात आणण्यात आलं होतं.

दरम्यान आज बदलापूरमध्ये तणावपूर्ण वातावरण आहे. काल झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला असून बदलापूरमधील इंटरनेट पूर्णपणे बंद आहे तसंच कलम 163 लागू करण्यात आलं आहे.

दरम्यान, हे आंदोलन करणाऱ्या ३०० जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सरकारी कामात अडथळा आणणं, दगडफेक, कायदा आणि सुव्यवस्था बाधित करणं अशा आरोपांखाली हे गुन्हे दाखल केल्याचं पोलिसांनी सांगितलं. याप्रकरणी २८ जणांना आज न्यायालयासमोर हजर केलं असता, न्यायालयानं त्यापैकी २२ जणांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

बदलापूर इथं झालेली घटना अत्यंत दुर्दैवी असून, ही घटना ज्या शाळेत घडली, त्या शाळेची आणि संबंधितांची चौकशी शिक्षण विभागाचे उपसंचालक आणि बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष करत असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं. चौकशीचा प्राथमिक अहवाल आल्यानंतर या घटनेमधल्या दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असंही केसरकर यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना नमूद केलं.

**बदलापूर - 'महाराष्ट्र बंद'**

बदलापूरमध्ये दोन लहान मुलींवर घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विरोधी पक्षांच्या वतीनं २४ ऑगस्ट रोजी 'महाराष्ट्र बंद' ची हाक देण्यात आली आहे, या बंदमध्ये समाजातील विविध घटकांनी सहभागी व्हावं , असं आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी आज मुंबईत पत्रकारांशी बोलताना केलं .

राज्यात मुली सुरक्षित नाहीत. रोज महाराष्ट्राची प्रतिमा मलीन होत आहे. त्यामुळे आम्ही ही बंदची हाक दिल्याचं पटोले म्हणाले. तर

या प्रकरणामध्ये कोणीही राजकीय फायदा घेत नसून राज्यात अत्याचाराने परिसीमा गाठली असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितलं.

दरम्यान बदलापूर घटनेच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटाकडून भंडाऱ्यातील त्रिमूर्ती चौक इथं आंदोलन करण्यात आलं . यावेळी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

**बदलापूर / अनिल देशमुख**

महाराष्ट्रात शक्ती कायद्याची अत्यंत गरज आहे. आम्ही सरकारमध्ये असताना तयार केलेला शक्ती कायदा अद्याप केंद्र सरकारने मंजूर केलेला नाही. गेले तीन वर्ष हा कायदा मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. महाराष्ट्रातील भाजपच्या नेत्यांनी केंद्राकडून हा कायदा मंजूर करून आणावा, असं आवाहन माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत केलं.

शक्ती कायदा हा सर्वपक्षीय आमदारांनी तयार केलेला कायदा आहे. या कायद्यामध्ये आरोपीला फाशी देण्याबाबतची सुद्धा तरतूद आहे. त्यामुळे हा कायदा मंजूर केला असता तर आज बदलापूर प्रकरणात या कायद्याची अंमलबजावणी करता आली असती, असं ते म्हणाले.

**राज्यसभा पोटनिवडणूक**

देशभरात राज्यसभेच्या १२ जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे. महाराष्ट्रातून खासदार पियुष गोयल आणि उदयनराजे भोसले लोकसभेवर निवडून गेल्यामुळे रिक्त झालेल्या दोन जागांवर पोटनिवडणूक होणार आहे. उदयनराजे भोसले यांच्या जागी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून आज नितीन पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. काल भाजपानं रायगडचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या नावाची घोषणा केली. या दोघांनीही आपाआपले उमेदवारी अर्ज दाखल केले. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस असून पुढच्या महिन्याच्या ३ तारखेला मतदान होणार आहे.

**राज ठाकरे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गोंदिया येथिल ग्रँड सीता हॉटेल मध्ये कार्यकर्त्यांसोबत बैठक घेतली. यावेळी बदलापूर येथील घटना ही पोलिसांनी नीट हाताळली नाही. एकदा माझ्या हातात सत्ता द्यावी असं आव्हान त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना केलं.

**मुख्यमंत्री भूमिपूजन**

रत्नागिरी विमानतळाच्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं भूमिपूजन म्हणजे रत्नागिरी जिल्ह्याच्या पर्यटनाचं नवं दार खुलं करण्याचा श्रीगणेशा आहे. रत्नागिरी जिल्हा पर्यटनासाठीचं केंद्र झाला पाहिजे. त्यासाठी हा विमानतळ महत्त्वाचा ठरेल,' असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केलं. त्यांच्या हस्ते रत्नागिरी विमानतळाच्या नवीन

प्रवासी टर्मिनल इमारतीचं भूमिपूजन झालं. त्या वेळी ते बोलत होते. रत्नागिरीचे पालकमंत्री आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

'देशाच्या प्रगतीसाठी, तसंच महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचं उद्दिष्ट गाठायचं असेल, तर उद्योग आणि पर्यटन या बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यासाठी रस्ते चांगले असण्यासोबतच परदेशी प्रवासी येण्यासाठी हवाई मार्गही महत्त्वाचा आहे. प्रत्येक तालुक्यात हेलिपॅड झालं पाहिजे, अशी माझी संकल्पना आहे. कारण अत्यवस्थ रुग्णांना झटपट मोठ्या शहरात उपचारांसाठी नेण्यासाठी, त्याचा उपयोग होईल. वैष्णोदेवीसारख्या ठिकाणी पर्यटकांसाठी हेलिकॉप्टर सेवा आहे. तसं पर्यटनाचं सर्किट तयार केलं पाहिजे. असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले

**राज्यस्तरीय कृषी महोत्सव**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे आजपासून बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे आजपासून पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचं उद्घाटन आज दुपारी अडीच वाजता केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, आ. पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत झालं. हा महोत्सव २५ आगस्ट पर्यंत चालणार आहे.

या महोत्सवात कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, परिसंवाद, चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री केंद्र, आधुनिक कृषी अवजारं प्रदर्शन, स्वंयसहाय्यता महिला बचत गट निर्मित वस्तू पदार्थांची विक्री असे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

**मंगलप्रभात लोढा**

पर्यटन, कौशल्य, उद्योजकता मंत्री आणि मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते आज महाराष्ट्रातल्या पहिल्या राज्यगीत कोनशिलेचं मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात अनावरण करण्यात आलं. 'आपण प्रथमच शासकीय कार्यालयात राज्यगीताच्या कोनशिलेचं अनावरण केलं आहे. आपण सर्वांनी या गीतातून प्रेरणा घ्यावी, यासाठी प्रवेशद्वाराच्या इथं कोनशिला बसवली आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्हा कार्यालय आणि तहसिल कार्यालयात ही कोनशिला बसवली जाईल.' असं लोढा यावेळी म्हणाले.

**आयबीपीएस आणि एमपीएस परीक्षा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणारी राज्यसेवा परीक्षा येत्या २५ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार आहे. परंतु त्याच दिवशी 'आयबीपीएस'ची देखील परीक्षा ठेवली आहे. या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी आल्यामुळे अनेक उमेदवारांना कोणत्या तरी

एका परीक्षेवर पाणी सोडावे लागणार आहे. वर्षानुवर्षे दोन्ही परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांवर हे अन्याय केल्यासारखे होईल. यासंदर्भात हे सर्वजण विविध माध्यमांतून शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. परंतु शासनाने त्यांच्याकडे योग्य ते लक्ष दिलेले नाही, असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आपल्या एक्स या समाजमध्यामावरील खात्यावरून व्यक्त केलं आहे.

आयबीपीएस परीक्षा आणि एमपीएससीची राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा या दोन्ही 25 ऑगस्ट रोजी एकाच दिवशी आल्या आहेत. तसेच कृषी विभागाच्या 258 जागांचा समावेश राज्य सेवा पूर्व परीक्षेत झालेला नाही. या दोन्ही कारणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे, त्यामुळे याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती सुळे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना केली आहे.

**हवामान**

विदर्भातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा नागपूरच्या हवामान खात्याने जारी केलाय. दरम्यान काल आणि आज नागपुरात अधून मधून ढगाळ वातावरण होतं तर उर्वरित वेळेत ऊन असल्याने उकाड्यात प्रचंड वाढ झाली आहे.

#####